॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## परीपत्रक क्रमांक : ११७ /२००६

BMC's, College of Social Work, Chopda IQAC

**विषय :- प्रथम वर्ष : कला, वाणिज्य व विज्ञान व इतर पदवीस्तर वर्गाच्या प्रवेशाबाबत.**
**संदर्भ :- विद्यापीठ परीपत्रक क्र.-३९/१९९५ व परीपत्रक क्र.५०/१९९६.**

महोदय/महोदया,

महाराष्ट्र शासनाने निर्णय क्रमांक:युएसजी २००३/(३३/०३)/२/विशि-४, दि.१६.४.२००३ अन्वये कला, वाणिज्य, विज्ञान व इतर पदवीस्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेबाबत नमूद केलेल्या नियमांच्या अनुषंगाने या परीपत्रकाव्दारे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांच्या मा. प्राचार्यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून प्रथम वर्ष कला, वाणिज्य, विज्ञान व इतर पदवीस्तरवर्गाची प्रवेश प्रक्रिया करतांना खालील बाबींचा प्रकर्षाने अवलंब करावा.

१. महाविद्यालयांनी प्रवेशाची माहिती पुस्तिका तयार करून ती प्रसिध्द करावी. त्यामध्ये प्रवेश प्रक्रिया कशी केली जाणार आहे त्याची माहिती, एकूण जागा, आरक्षणासाठी ठेवण्यात आलेल्या जागा तसेच अभ्यासक्रमाची माहिती देण्यात यावी. शिक्षण शुल्क व इतर शुल्क याचा उल्लेख माहिती पुस्तिकेत करावा.
२. प्रवेश अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्याची गुणवत्ता यादी तयार करण्यात यावी व ती नोटीस बोर्डावर विद्यार्थ्यांच्या निदर्शनास येईल अशा ठिकाणी लावावी. त्यात दुरूस्त्या असल्यास त्यांचे निराकरण करण्यात यावे व अंतीम गुणवत्ता यादी प्रसिध्द करावी.
३. विद्यापीठाच्या शैक्षणिक पात्रता नियमांच्या अधिन राहून मान्य प्रवेश संख्येतच गुणवत्तेनुसार प्रवेश द्यावेत. त्यापेक्षा अधिक प्रवेश देवू नये. त्याची जबाबदारी सर्वस्वी प्राचार्यांची राहील.
४. प्रवेश पात्रते संबंधी विद्यापीठाच्या परीपत्रक क्र.११०/२००६, जा.क्र.उमवि/Eli/६/१२/९४१ /२००६, दि. ९ /६/२००६ अन्वये कार्यवाही करावी.
५. महाविद्यालयाने मान्यताप्राप्त अभ्यासक्रमासच विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत. विषयास विद्यापीठाची मान्यता नसल्यास प्रवेश देवू नये. असे आढळून आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील.
६. विद्यार्थ्यांकडून इतर शुल्क आकारतांना विद्यापीठाचे परीपत्रक क्र.१४३/२००३, परीपत्रक क्र.११९/२००४ व त्याअनुषंगाने निर्गमित केलेल्या परीपत्रकांप्रमाणेच शुल्क आकारावे त्या व्यतिरीक्त इतर (शिक्षण शुल्क वगळता) कोणतेही शुल्क आकारू नये.
७. प्रथम वर्ष कला वर्गात डी.एड. पदविका अभ्यासक्रम इंग्रजी विषयासह उत्तीर्ण केलेल्या व अभियांत्रिकी पदविका धारक विद्यार्थ्यांना एकूण प्रवेश क्षमतेच्या १०% पर्यंत प्रवेश त्या-त्या संवर्गातून देता येतील. तसेच प्रथम वर्ष विज्ञान व वाणिज्य वर्गात एकूण प्रवेश क्षमतेच्या १०% पर्यंत प्रवेश अभियांत्रिकी पदविका धारक विद्यार्थ्यांना देता येतील. सदर १०% प्रवेशांमधील प्रवेश वरीलप्रमाणे पूर्ण होवू शकले नाहीत तर त्या रिक्त जागांवर पात्रता नियमानुसार पात्र असलेल्या त्या-त्या कोट्यातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावेत.
८. व्यवस्थापनासाठी १५% जागा विद्याशाखा निहाय ठेवण्यात याव्यात. (शासकीय संस्था/महाविद्यालये वगळून)
९. शासनाकडून/ शिक्षण संचालनालयाकडून प्राप्त झालेली व विद्यापीठाने पृष्ठांकीत करुन पाठविलेली विविध परीपत्रके, पत्रे, आदेश यात नमूद केलेली विविध मुद्दे प्रवेशा प्रकीया करतांना लक्षात घ्यावे
१०. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार एकूण प्रवेश क्षमतेच्या ५०% जागा मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय घटकांसाठी खालीलप्रमाणे राखीव राहतील.

| | | |
|---|---|---|
| १०.१) अनुसुचित जाती व अनु.जाती मधील बौध्द धर्म स्विकारलेल्या व्यक्ती | - | १३ % |
| १०.२) अनुसुचित जमाती | - | ७ % |
| १०.३) विमुक्त जाती (१४ तत्सम जाती)(व्ही.जे.) | - | ३ % |
| १०.४) भटक्या जमाती ( जानेवारी, १९९० पूर्वीच्या २८ तत्सम जाती) (एन.टी.-१) | - | २.५ % |

Bhagini Mandal Chopda's

(कृ.मा.प.)

| | | |
|---|---|---|
| १०.५) भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती) **(एन.टी.-२)** | - | ३.५ % |
| १०.६) भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती) **(एन.टी.-३)** | - | २ % |
| १०.७) इतर मागासवर्गीय **(ओ.बी.सी.)** | - | १९ % |
| एकूण | - | ५० % |

**टिप:-** एन.टी.-२ व एन.टी.-३ ह्या संवर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ते उन्नत व प्रगत व्यक्ती गटात मोडत नसल्याबाबतचे शासनाचे नियम लागू राहतील.

१०.८) प्रवेश प्रक्रियेनंतर काही जागा रिक्त राहील्या तर त्या जागांवर एकूण प्रवेश क्षमतेच्या २ % पर्यंत प्रवेश विशेष मागास प्रवर्गातील (एस.बी.सी.) विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार द्यावेत.

११. अपंग विद्यार्थ्यांना आरक्षण :- खुल्या प्रवर्गातील ५०% जागा व राखीव प्रवर्गातील ५०% जागा अंतर्गत स्वतंत्रपणे ३% आरक्षण लागू राहील. (विद्यापीठाने पृष्ठांकित केलेले महाराष्ट्र शासनाचे क्र.No. CPWD /PWD/ACT/ IMPLE/03.04/1285, Dated: 6.6.2003 पत्राचे अवलोकन करावे.)

१२. आजी/माजी सैनिक हयांचे करीता विहीत करण्यात आलेल्या २% आरक्षणांतर्गत प्रवेश करतांना विद्यापीठाच्या परीपत्रक क्र.९२/२००५, दि.२ मार्च, २००५ नुसार कार्यवाही करावी.

१३. प्रथम वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान या पदवीसाठी मंजूर प्रवेश संख्येपेक्षा अधिकचे १०% जागांवर प्रवेश करता येतील. मात्र त्याबाबतची कार्यवाही करण्यापूर्वी उपकुलसचिव,संलग्नता विभाग यांचेकडे पूर्व परवानगीसाठी प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहील. त्याकरीता संलग्नता विभागाशी संपर्क साधावा.

१४. प्रवेश प्रक्रिया दरवर्षी **दिनांक : १५ ऑगष्ट पर्यंत पूर्ण करण्यात येवून ३१ ऑगष्ट पर्यंत** प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी पात्रता विभागास सादर करणे आवश्यक राहील.

१५. प्रवेशाबाबत तक्रारी आल्यास त्यांची तपासणी विद्यापीठाकडून करण्यात येईल.

तेव्हा, आपल्या महाविद्यालयाची प्रवेश प्रक्रिया गुणवत्तेनुसार व पारदर्शकतेने करण्यात यावी. ही विनंती.

आपला विश्वासू,

**जा.क्र.:उमवि/१२/पदवी-प्रवेश/९४४/२००६)**
**दिनांक : ९ जुन, २००६ )**

उपकुलसचिवांकरीता
(प्रवेश व पात्रता विभाग)

**प्रति,**

१) उ.म.वि.शी संलग्नित सर्व कला, वाणिज्य, विज्ञान व पदवीस्तर अभ्याक्रमाच्या महाविद्यालयांचे मा. प्राचार्य.

२) उ.म. वि. च्या मान्यता प्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक.

**प्रत माहितीस्तव :-**

१.मा.अधिष्ठाता सर्व विद्याशाखा, उ.म.वि., जळगाव.

२.उ.म.वि.चे सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागांचे प्रमुख.

C:\MY DOCUMENTS\ADMISS~2.DOC\प्रायो

Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work, Chopda

Co-Ordinator,
Internal Quality Assurance Cell
BMC's, College of Social Work
Chopda, Dist. Jalgaon